माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वयेदाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२६५२**

**अपिलार्थी श्री. मोहम्मद नबी इकबाल शेख**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार सक्षम प्राधिकारी-१(टे.-१-प्र)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई (सक्षम प्राधिकारी-१) यांचे कार्यालय
पाचवा मजला, ए विंग,प्रशासकीय इमारत,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, सक्षम प्राधिकारी-१**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई (सक्षम प्राधिकारी-१) यांचे कार्यालय
पाचवा मजला, ए विंग,प्रशासकीय इमारत,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.१२.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.०५.२०२४ | १९.०६.२०२४ | २८.०६.२०२४ | ०२.०८.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २७.०८.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माझे म्हणणे ऐकले नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १९.०६.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०२.०८.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १४.०५.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"सुभेदार रामजी आंबेडकर नगर, वरळी, मुंबई जा.क्र. २४४७३ दि. ०८.०५.२०२४ अन्वये ५८ झोपडीधारकांची पात्रतेचे आदेश काढले त्याचे संपूर्ण कागदपत्रांची माहिती मिळण्याबाबत."*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.०६.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, सदर प्रकरणात अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याने आपणास माहिती पुरविता येत नाही. अंतिम निर्णय होताच मागणी केलेली माहिती आपणास पुरविण्याची तजविज शासन नियमान्वये ठेवणेत आलेली आहे. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २८.०६.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०८.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी शासकीय अभिलेखातील उपलब्ध माहिती अपिलार्थींना १० दिवसांत द्यावी असे आदेशित करुन अपील निकाली काढलेले आहे.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

५. सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहेत. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

६. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दलच्या खुलाशासह तसेच उपलब्ध माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १६.१२.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

10-12-2025

**मुंबई**
**दिनांक : १०.१२.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**